# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३६८-२२ दिनांक ०२/१२/२०२२

## अल्पवयीन मुलीवर लैंगीक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली १० वर्ष व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा.

मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ३/२/२०१६ रोजी दुपारच्या सुमारास एका ७ वर्षाच्या मुलीवर शेजारीच राहणाऱ्या आरोपीत नामे भरतकुमार झा वय-४७ वर्ष याने अल्पवयीन मुलीस पळवून नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केले होते. सदर घटनेबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने दिनांक ७/२/२०१६ रोजी तक्रार दिल्याने विरार पोलीस ठाणे येथे I गुरनं ७३/२०१६ भादंवि ३६३, ३७६ (२), (आय), ३५४ सह लैंगीक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधि. २०१२ चे कलम ३ (क), ४, ५(म), ६, ७, ८ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तात्कालीन तपासी अधिकारी सपोनी श्री अरविंद कांबळे यांनी आरोपीतास तात्काळ अटक करुन व सबळ पुरावे हस्तगत करुन मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वसई येथे दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर गुन्हयाची मा. न्यायालयामध्ये सुनावणी होवून आज दिनांक २/१२/२०२२ रोजी मा. न्यायालयाने आरोपीतास १० वर्ष कारावास व ५ हजार रुपये दंड (दंड न भरल्यास एक महिना साधा कारावास) अशी शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्हयाचे सुनावणीकरिता सरकारी वकील म्हणून श्री जयप्रकाश पाटील यांनी कामकाज पाहिले असून पैरवी अधिकारी पोउपनी मोहिते व कोर्ट अंमलदार म्हणून सहापोउपनी जयराम राउत यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली कामकाज पार पाडले आहे.

---ooo---